RNI No. MAHBIL /2009/31733

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-अ

वर्ष ८, अंक २३] मंगळवार, मार्च २२, २०२२/चैत्र १, शके १९४४ [पृष्ठे ४, किंमत : रुपये १५.००

**असाधारण क्रमांक ४७**

## प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

## महसूल व वन विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय (विस्तार इमारत), मुंबई ४०० ०३२, दिनांक १५ मार्च २०२२.

**अधिसूचना**

**भारताचे संविधान.**

क्रमांक आस्थापना-२०१९/प्र.क्र.१२४/म-१ (आस्था.).—भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद ३०९ खालील परंतुकाद्वारे प्रदान करण्यात आलेल्या शक्तीचा वापर करून आणि यासंदर्भात सध्या अस्तित्वात असलेले सर्व विद्यमान नियम, आदेश आणि अनुदेश अधिक्रमित करून महाराष्ट्राचे राज्यपाल याद्वारे महाराष्ट्र शासनाच्या महसूल व वन विभागाच्या अखत्यारीमधील नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रकाच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील नोंदणी व मुद्रांक कार्यालयांतील " दुय्यम निबंधक (श्रेणी-१) / मुद्रांक निरीक्षक गट-ब (अराजपत्रित) " व " वरिष्ठ लिपीक/ पर्यवेक्षक (गट-क) " या संवर्गाच्या सेवाप्रवेशाचे विनियमन करणारे पुढील नियम करीत आहेत, जसे :—

१. या नियमांना नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रकाच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील नोंदणी व मुद्रांक कार्यालयांतील " दुय्यम निबंधक (श्रेणी-१) / मुद्रांक निरीक्षक गट-ब (अराजपत्रित)" व " वरिष्ठ लिपीक / पर्यवेक्षक (गट-क) " संवर्गाचे (सेवाप्रवेश) नियम, २०२२ असे संबोधण्यात यावे.

२. या नियमात संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,

(क) पदवी याचा अर्थ संविधिक विद्यापीठाची पदवी.

(ख) शासन याचा अर्थ महाराष्ट्र शासन.

३. विभागाच्या अधिपत्याखालील नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रकाच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील नोंदणी व मुद्रांक कार्यालयांतील "दुय्यम निबंधक (श्रेणी-१) / मुद्रांक निरीक्षक गट-ब (अराजपत्रित) " या पदावरील नियुक्ती एकतर,—

(क) वरिष्ठ लिपीक/ पर्यवेक्षक हे पद धारण करणाऱ्या व सदर पदावर तीन वर्षांपेक्षा कमी नाही इतकी नियमित सेवा केलेल्या व्यक्तीमधून ज्येष्ठता अधीन पात्रता या निकषावर योग्य व्यक्तीच्या पदोन्नतीने करण्यात येईल ; किंवा

(ख) पुढील अटी पूर्ण करणाऱ्या उमेदवारांमधून नामनिर्देशाद्वारे करण्यात येईल,—

(एक) एकोणीस वर्षांपेक्षा कमी वय नसलेल्या आणि खुल्या वर्गातील व्यक्तींसाठी अडतीस वर्षांपेक्षा जास्त वय नसलेल्या आणि मागासवर्गीय व्यक्तींसाठी त्रेचाळीस वर्षांपेक्षा जास्त वय नसलेल्या ; आणि

(दोन) ज्यांनी पदवी धारण केलेली आहे.

४. नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रकाच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील नोंदणी व मुद्रांक कार्यालयांतील " वरिष्ठ लिपीक/ पर्यवेक्षक (गट-क)" या पदावरील नियुक्ती " लिपीक/ मुद्रांक विक्रेता " हे पद धारण करणाऱ्या व सदर पदावर तीन वर्षांपेक्षा कमी नाही इतकी नियमित सेवा केलेल्या व्यक्तीमधून ज्येष्ठता अधीन पात्रता या निकषावर योग्य व्यक्तीच्या पदोन्नतीने करण्यात येईल.

५. नियम ३ मध्ये नमूद केलेल्या पदावर पदोन्नतीने व नामनिर्देशनाने नियुक्तीचे प्रमाण ५०: ५० असे राहील.

६. नियम ३ मध्ये नमूद केलेल्या पदावर नामनिर्देशनाने नियुक्त केलेली व्यक्ती दोन वर्षांच्या कालावधीसाठी परीविक्षाधीन असेल. परिविक्षाधीन कालावधी जास्तीत जास्त एका वर्षाने वाढवता येईल. सदर पदावर नियुक्त केलेल्या व्यक्तीस परिविक्षाधीन कालावधी यशस्वीरित्या पूर्ण करणे आवश्यक राहील. जर त्याने परिविक्षाधीन कालावधी यशस्वीरित्या पूर्ण केला नाही किंवा या पदासाठी तो पात्र आढळून आला नाही तर त्याची सेवा समाप्त करण्यास तो पात्र ठरेल.

७. नियम ३ मध्ये नमूद केलेल्या पदावर नामनिर्देशनाने नियुक्त झालेल्या व्यक्तीने विहित कालावधीत विभागीय परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील. जर तो विहित विभागीय परीक्षा उत्तीर्ण झाला नाही तर त्याची सेवा समाप्त करण्यास तो पात्र ठरेल.

८. नियम ३ मध्ये नमूद केलेल्या पदावर नियुक्त झालेल्या व्यक्तीने, याबाबतीत करण्यात आलेल्या नियमानुसार हिंदी व मराठी भाषा परीक्षा, अगोदरच उत्तीर्ण केलेल्या नसतील किंवा त्या परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून तिला सूट मिळाली नसेल, तर तिला सदर परीक्षा उत्तीर्ण करणे आवश्यक राहील.

९. नियम ३ व ४ मध्ये नमूद केलेल्या पदावर नेमणूक झालेल्या व्यक्तीने महाराष्ट्र शासनाच्या माहिती व तंत्रज्ञान संचालनालयाने वेळोवेळी विहित केलेले संगणक संचलन प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक राहील.

१०. नियम ३ व ४ मध्ये नमूद केलेल्या पदांवर नियुक्त करण्यात आलेली व्यक्ती महाराष्ट्र राज्यात कोठेही बदली करण्यास पात्र राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**डॉ. नितिन करीर,**
शासनाचे अपर मुख्य सचिव,
महसूल, मुद्रांक व नोंदणी.

## REVENUE AND FOREST DEPARTMENT

Mantralaya, Madam Cama Marg,
Hutatma Rajguru Chowk, Mumbai 400 032, dated the 15th March 2022.

*NOTIFICATION*

CONSTITUTION OF INDIA.

No. EST-2019/C.R.124/M-1(Est.).—In exercise of the powers conferred by the proviso to Article 309 of the Constitution of India, and in supersession of all existing rules, orders or instrument issued in this behalf, the Governor of Maharashtra is hereby pleased to make the following rules regulating recruitment to the posts of Sub-Registrar (Grade 1) or Inspector of Stamps, Group B (Non Gazetted) and Senior Clerk or Supervisor, Group C, under the Inspector General of Registration and Controller of Stamps under the administrative control of the Revenue and Forests Department, Government of Maharashtra, namely :—

1. These Rules may be called the Sub-Registrar (Grade 1) or Inspector of Stamps, Group B (Non Gazetted) and Senior Clerk or Supervisor, Group C (Recruitment) Rules, 2022.

2. In these Rules, unless the context requires otherwise,—

(*a*) " Degree " means a degree of a statutory university ;

(*b*) " Government " means the Government of Maharashtra.

3. Appointment to the post of Sub-Registrar (Grade-1) or Inspector of Stamps, Group-B (Non-Gazetted) in the office of the Inspector General of Registration and Controller of Stamps shall be made either,—

(*a*) by promotion of a suitable person on the basis of seniority, subject to fitness, from amongst the persons holding the post of Senior Clerk or Supervisor, having not less than three years regular service on that post; or

(*b*) by nomination from amongst the persons who,—

(i) are not less than nineteen years of age and not more than thirty-eight years of age:

Provided that age limit shall be relaxed up to five years in case of persons belonging to the Reserved Category ;

(ii) Possess a degree of a statutory university.

4. Appointment to the post of Senior Clerk or Supervisor in the office of the Inspector General of Registration and Controller of Stamps shall be made by promotion of a suitable person on the basis of seniority, subject to fitness, from amongst the persons holding the post of Junior Clerk or Stamp Vendor, having not less than three years of regular service on that post.

5. Appointment to the post mentioned in Rule 3 by promotion and nomination shall be made in the ratio of 50 : 50.

6. A person appointed to the post mentioned in rule 3 by nomination shall be on probation for a period of two years. The probation period may be extended further for a period of one year. A person appointed to the said post shall be required to complete the probation period successfully within the prescribed period. If he fails to complete the probation period successfully or is not found suitable, then he shall be liable to be terminated from service.

7. A person appointed to the post mentioned in rule 3 shall be required to pass the Departmental Examination. If he does not pass the prescribed Departmental Examination, within the prescribed period, he shall be liable to be terminated from service.

8. A person appointed to the post mentioned in rule 3, shall be required to pass examinations in Hindi and Marathi according to the rules made in that behalf, unless he has already passed, or has been exempted from passing those examinations.

9. A person appointed to the post mentioned in rules 3 and 4, shall be required to possess a Certificate in Computer Operation as prescribed by the Directorate of Information Technology, Government, from time to time.

10. A person appointed to the posts mentioned in rules 3 and 4 shall be liable for transfer anywhere in the State of Maharashtra.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

Dr. NITIN KAREER,
Additional Chief Secretary to Government,
Revenue, stamp duty and registration.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.